महासागर
शनिवार, दि. 11 सप्टेंबर 2025
अमरावती
पान 3



# संताप : ग्रामपंचायतच्या अधिकाराचे हनन करू नका!

■जि.प.अंतर्गतची कामे ग्रामपंचायत स्तरावरच द्या !

■जिल्हा परिषदेवर धडकले मेळघाटातील सरपंच

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, ( दि. 10 )**– मेळघाट क्षेत्रातील ग्रामपंचायत अंतर्गत मूलभूत विकास कामे करण्यासाठी दहा ते पंधरा लाख रुपयांची मुभा ग्रामपंचायतीकडे असल्याचे शासन निर्णय असूनही, जिल्हास्तरावरून कामे थांबवण्यात आल्याने सरपंच संतप्त झाले आहेत. सोमवारी मेळघाट परिसरातील सरपंचांनी आपली शासन निर्णयाची प्रत घेऊन जिल्हा परिषदेमध्ये धडक दिली, यावेळी ग्रमपंचायतीच्या अधिकारांचे हनन न करता, न्याय करण्याची मागणी केली.


जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यपालन अधिकारी प्रीती देशमुखयांना निवेदन सादर करण्यात आले. सोबतच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांनाही निवेदन देऊन विकास कामांना गती देण्याची मागणी केली. शासन निर्णय क्र. झेडपीए-2021/प्र.क्र.45/वित्त-9 दिनांक 20/09/2024 नुसार, ग्रामपंचायतीकडे मूलभूत विकासाच्या कामांसाठी दहा ते पंधरा लाख रुपये खर्च करण्याची मुभा आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या कामांवर बंदी घालण्यात आल्याचा आरोप सरपंच संघटनेने निवेदनात केला.

काटकुंभ, मंगली, बेलखेडा, बाबा साकोम, कविता बुद्रुक, संजू साकोम, दहेन्द्री, नारायण चिमटे, चूरणी, के बी झामरकर, रामदास कासदेकर, विमल बेठकर, अनिता काळे, कुसुम कासदेकर, अंबा पाटील, शंकर गोरे, सुरेश धिकार, वज्रेश्वर मरसकोल्हे, सुजित भास्कर, वैशाली राठोड आणि अन्य अनेक सरपंच उपस्थित होते. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा फी पावती देण्यास नकार दिल्यामुळे आणि ज्या सरपंचांनी फी भरली आहे त्यांना देखील कार्यरंभ आदेश देण्यात टाळाटाळ होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला. सरपंचांनी विकास कामांना तातडीने गती देण्यासाठी प्रशासनाने योग्य ती दखल घेण्याची मागणी केली आहे.

> “जिल्हा परिषद अंतर्गत गावठाण हद्दीतील मूलभूत कामे ग्रामपंचायत एजन्सी म्हणून ग्रामपंचायत स्तरावर देण्याबाबत शासन निर्णय आहे. परंतु, जिल्हास्तरावरून ती कामे रोखण्यात आली आहेत, हे ग्रामपंचायतीचे अधिकाराचे हनन आहे.
>
> **ललिता बेठेकर**
> **सरपंच, काटकुंभ, ता. चिखलदरा.**

# शहरात अर्ध्या तासात दोन चेन स्नॅचिंग

## दिवाळीच्या तोंडावर महिला दहशतीत | बडनेरा व राजापेठ पोलिस स्टेशन हद्दीत घटना



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 10 )**– अमरावती शहरात चेन स्नॅचिंगच्या घटनांमुळे महिलांच्या सुरक्षेची चिंता वाढली आहे. फक्त अर्ध्या तासात दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या हिसकावल्या गेल्या, ज्यामध्ये सुमारे 2 लाख रुपये किमतीचे दागिणे चोरट्यांनी लंपास केले. या सलग घटनांमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, दिवाळीच्या तोंडावर शहरातील महिला दहशतीत आल्या आहेत.

### पहिली घटना – जयप्रभा कॉलनी परिसर

राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत 9 ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास फिरायला गेलेल्या महिलेला मोटारसायकलवरून आलेल्या दोन तरुणांनी गोपाल किराणा दुकानाजवळ अचानक ढकलून तिच्या गळ्यातील सुमारे 15 ग्रॅम वजनाची सोन्याची चेन हिसकावली. पीडित महिलेनं तत्काळ पोलिसांत तक्रार दाखल केली असून, दोन अज्ञात चोरांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### दुसरी घटना – बडनेरा येथील शशिनगर परिसर

बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत शशीनगर येथील एका महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांची गणपती पेंडॉल आणि साईबाबांच्या पेंडॉल हिसकावून मोटारसायकलवरून फरार झाले. या दोन्ही वस्तूंची किंमत अंदाजे 1 लाख 20 हजार रुपये आहे. बडनेरा पोलिसांनी दोन अज्ञात संशयितांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### सिसीटीव्ही तपास सुरू

राजापेठ आणि बडनेरा ठिकाणी अर्ध्या तासाच्या अंतराने घडलेल्या घटनांमागे एकाच टोळीचा हात असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. दोन्ही ठिकाणी पंचनामा करून परिसरातील सिसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहे. अद्याप आरोपींची ओळख पटलेली नसली तरी पोलिसांना लवकरच त्यांचा शोध लागेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

### सावधगिरीचे आवाहन

पोलिसांनी नागरिकांना अशा ठिकाणी रात्री किंवा एकटे फिरण्यापासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच, बाहेर जाताना सोन्याचे महागडे दागिने किंवा मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सोबत न ठेवण्याच्या सूचना केल्या आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर आरटीओ विभागाची धडक कारवाई

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती ( दि. 10 )** – अमरावती विभागातील महामार्ग, राज्यमार्ग तसेच ग्रामीण रस्ते मार्गावर गेल्या काही महिन्यांत अवैध प्रवासी वाहतूक व परवाना अटी शर्तीचा भंग करणाऱ्या प्रवासी वाहन, स्टेज कॅरेज च्या नियमाचा भंग करणाऱ्या प्रवासी बसेस वर मोटार वाहन कायदा व नियमाचे उल्लंघन केल्याने विविध गुन्हा खाली कारवाई करण्यात आली आहे.

अमरावती ते मोर्शी, वरुड ते पांढुर्णा, मुलताई रस्त्यावर चालणाऱ्या स्टेज कॅरेज प्रवासी बसेस वर तसेच परतवाडा ते अंजनगाव, आकोट मार्गे अकोला, परतवाडा ते धारणी या मार्गांवरील धावणाऱ्या बसेस वर देखील कार्यवाही करण्यात आली.यामध्ये विनापरवाना, कॉन्ट्रॅक्ट कॅरेज परवाण्याच्या शर्तीचे भंग करणाऱ्या, जादा भाडे आकारणाऱ्या, वेळापत्रकाचे पालन न करणाऱ्या बसेस ची तपासणी करण्यात आली. या मधे दोषी वाहना वर कार्यवाही करण्यात आली. 16 डिसेंबर 2024 ते 30 जून 2025 या कालावधीत 429 वाहने तपासली गेली असून त्यापैकी 143 दोषी ठरली. या कालावधीत एकूण 7,70,750 रुपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. तर 1 जुलै 2025 ते 30 सप्टेंबर 2025 या तीन महिन्यांत 396 वाहने तपासून 132 दोषी वाहनांवर 7, 27, 250रुपये इतके दंडात्मक शुल्क आकारण्यात आले आहे. अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्याकरिता ही मोहीम या पुढेही सुरू राहणार असून दोषी बस मालक व चालकां विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल तसेच सणासुदीच्या काळात रस्ते वाहतूक सुरक्षा व ज्यादा भाडेवाढ या अनुषंगाने तपासणी मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल असेही प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी या वेळी सांगितले.

# अल्पवयीन मुलाचे अपहरण

**अमरावती** – राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत गोपाल नगरातील 15 वर्षीय मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार वडिलांनी दाखल केली आहे. तक्रारीनुसार, मुलाने 4 ऑक्टोबर रोजी घरातून 25 ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी गायब केली होती. सुरुवातीला मुलाने या बाबतीत टाळाटाळ केली, परंतु नंतर साखळी घेतल्याची कबुली दिली. मुलाने घरातून पळ काढला आणि 7 ऑक्टोबरपर्यंत तो परत आला नाही. या प्रकरणी वडिलांनी मुलाला फूस लावून अपहरण केले असल्याचा आरोप केला आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# आजपासून लुटता येईल मेळघाट जंगल सफारीचा आनंद

## दिवाळीच्या सुट्ट्यांच्या तोंडावर पर्वणी



महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.10 )**– मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारीचा हंगाम आज, 10 ऑक्टोबरपासून सुरु झाला आहे. पावसाळ्यामुळे काही काळ बंद असलेली वैराट सफारी आता पुन्हा पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहे. त्यामूळे दिवाळीच्या सुट्ट्यांच्या तोंडावर ही पर्यटकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील महाराष्ट्रातील पहिले टायगर प्रोजेक्ट असलेले मेलघाट व्याघ्र प्रकल्प वाघ, बिबट्या, अस्वल, नीलगाय, सांबर तसेच दुर्मिळ पक्ष्यांच्या प्रजातींसाठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी हजारो पर्यटक येथे जंगल सफारीचा अनुभव घेण्यासाठी भेट देतात.

### सकाळ-संध्याकाळ सत्रांसाठी ऑनलाइन बुकिंग

मेलघाट व्याघ्र प्रकल्पातील हरिसाळ, कोलाम, सेमाडोह आणि चिखलदरा रेंजमध्ये जंगल सफारी आयोजित केली आहे. पर्यटकांना सकाळ आणि संध्याकाळ या दोन्ही सत्रांसाठी ऑनलाइन बुकिंगची सुविधा उपलब्ध आहे.

### मोबाइल फोटोग्राफीवर बंदी

सफारी दरम्यान मोबाइलद्वारे फोटोग्राफीवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. हा निर्णय वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी, निसर्गातील शांतता टिकवण्यासाठी आणि पर्यटकांमध्ये शिस्त राखण्यासाठी घेण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या मते, मोबाइल वापरामुळे प्राण्यांच्या वर्तनात बदल होतो, ज्याचा त्यांच्या सुरक्षेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

### निसर्गप्रेमींसाठी अद्भुत अनुभव केंद्र

मेलघाट व्याघ्र प्रकल्प निसर्गसौंदर्य, वन्यजीवांचे वैभव आणि शांत वातावरणामुळे निसर्गप्रेमींसाठी एक अद्भुत अनुभव देणारे केंद्र ठरले आहे. पर्यटकांना येथे आदरपूर्वक आणि सुरक्षित पद्धतीने वन्यजीवांचे निरीक्षण करण्याची संधी मिळते. सफारीसाठी नियोजित नियमांचे पालन करून पर्यटक निसर्गसौंदर्याचा आनंद घेऊ शकतात, असे वन्यजीव अधिकाऱ्यांनी सांगितले.

# विशेष पॅकेज मध्ये चांदूर, धामणगाव रेल्वे तालुक्यांचा समावेश

■सुधारित शासन निर्णय जाहीर

■आ. प्रताप अडसड यांच्या प्रयत्नांना यश



महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, ( दि. 10 )** – राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टी बाधितांच्या विशेष मदत पॅकेजमधून चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे तालुक्याला 9 ऑक्टोंबरच्या शासन निर्णयातून वगळण्यात आले होते. यानंतर आमदार प्रताप अडसड यांनी 10 ऑक्टोंबरला विभागीय आयुक्त यांना निवेदन दिले तसेच मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला व लगेचलगेच काही तासांत सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. यामध्ये चांदूर रेल्वे व धामणगाव तालुक्यासह जिल्ह्यातील 14 ही तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग समाधान व्यक्त करीत आहे. या शासन आदेशात पीक, पशुधन, जमिन आणि घरांसह सर्वच नुकसानीसाठी एनडीआरएफच्या निकषांनुसार मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील 347 तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर 2025 या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपिकांचे



नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, विहिरीचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घर पडझड, घरातील वस्तु/साहित्य नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे राज्यातील 347 तालुके अतिवृष्टी व पुरामुळे बाधित तालुके म्हणून सरकारने घोषित केले आहेत. याबाबत सुधारित शासन निर्णय 10 ऑक्टोंबर रोजी जाहीर झाला आहे. यात चांदूर रेल्वे व धामणगावचा सुध्दा समावेश केला आहे.

# दारुच्या नशेत कारचालक सुसाट

## उभ्या वाहनांना दिली धडक; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 10 )** – दारूच्या नशेत वाहन चालविण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना, शहरातील श्रीकृष्णपेठ परिसरात भरधाव 'स्विफ्ट डिझायर' कारने पार्किंगमध्ये उभ्या गाडीला जबरदस्त धडक दिल्याची धक्कादायक घटना घडली. या अपघातात गाडीचे तब्बल दीड लाख रुपयांचे नुकसान झाले असून, पोलिसांनी दारूच्या नशेत गाडी चालवणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना 9 ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली.

श्रीकृष्णपेठ येथील रहिवासी सागर संजय झुनझुनवाला (28) यांनी यासंदर्भात सिटी कोतवाली पोलिसात तक्रार दाखल केली. ते बंगलोरमधील एका नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असून, सध्या 'वर्क फ्रॉम होम' करत आहेत. रात्री ऑनलाईन मिटिंगदरम्यान जोराचा आवाज झाल्याने ते घराबाहेर आले असता, त्यांच्या शेवरलेट सैल (क्र. एमएच-21 एएक्स-1120) गाडीला भरधाव स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच-02 डीझेड-2093) ने जोरदार धडक दिल्याचे दिसून आले.

धडक एवढी जबरदस्त होती की गाडीचा बंपर, बोनट, हेडलाईट आणि मागील भाग पूर्णत: उद्ध्वस्त झाला. आरोपी चालक रुपेश भाऊराव आठवले (28, रा. दर्यापूर सामदा, जि. अमरावती) हा कारमध्येच नशेत बसलेला आढळून आला. चौकशीत तो अत्यंत असंबद्ध बोलत असल्याचेही साक्षीदारांचे म्हणणे आहे. तक्रारदार झुनझुनवाला यांनी पोलिसांना सांगितले की, रुपेश आठवले हा पूर्णपणे दारूच्या नशेत, निष्काळजी आणि बेदरकार पद्धतीने वाहन चालवत होता.

नशेतल्या या बेफिकीर ड्रायव्हरमुळे आमचे आर्थिक नुकसान झाले, पण जर हा अपघात रस्त्यावर झाला असता, तर जीवितहानीही टळली नसती. या प्रकारानंतर परिसरात काही वेळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेऊन वैद्यकीय तपासणीसाठी पाठवले. दरम्यान, पोलिसांनी आरोपी रुपेश आठवले याच्याविरुद्ध दारूच्या नशेत निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविण्याचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# महिलेच्या मृत्यूनंतर खासगी रुग्णालयात तणाव

## उपचारातील निष्काळजीपणाचा आरोप; डॉक्टरांवर कारवाईची मागणी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 10 )** शहरातील वालगाव रोडवरील धरमकाटा कॉम्प्लेक्समधील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या महिलेचा रात्री अचानक मृत्यू झाल्याने संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयात गोंधळ घातला. मृत्यूसाठी डॉक्टर जबाबदार असल्याचा आरोप करत कुटुंबीयांनी तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

शिराला पुसला गावातील राजिका इकरामोद्दीन (वय 46) ही महिला काही दिवसांपूर्वी चालत्या वाहनातून पडून जखमी झाली होती. तिच्या हाताला फ्रॅक्चर झाल्याने 4 ऑक्टोबर रोजी वालगाव रोडवरील धरमकाटा कॉम्प्लेक्समधील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल



करण्यात आले. हातावर प्राथमिक उपचार करून तिला रुग्णालयात ठेवण्यात आले होते. तथापि, जखमी असूनही राजिका चालण्यास सक्षम होती आणि तिची प्रकृती स्थिर असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. मात्र, गुरुवारी मध्यरात्री तिची तब्येत अचानक बिघडली आणि काही वेळातच तिचा मृत्यू झाला. ही माहिती मिळताच, कुटुंबीयांनी संताप व्यक्त करत रुग्णालयात जमाव केला. त्यांनी डॉक्टरांवर उपचारात निष्काळजीपणा केल्याचा आरोप करत कारवाईची मागणी केली. माहिती मिळताच, पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. मृतदेह ताब्यात घेऊन पोलिसांनी तो जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. शनिवारी शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यान, पोलिसांनी या घटनेची नोंद घेत तपास सुरू केला आहे. महिलेचा मृत्यू नेमक्या कोणत्या कारणाने झाला, हे शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर स्पष्ट होणार आहे.

# बांधकामाधीन इमारतीतून अॅल्युमिनियम पाईप चोरी; दोघे जेरबंद

## गाडगेनगर पोलिसांची कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ( 10 )** – शहरातील गाडगेनगर परिसरात सुरू असलेल्या बांधकामाधीन इमारतीतून अॅल्युमिनियम पाईप चोरी करणाऱ्या दोघा चोरट्यांना पोलिसांनी गजाआड केले. त्यांच्या ताब्यातून 39 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आणखी एक संशयित फरार असल्याची माहिती मिळाली आहे. ही कारवाई गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या पथकाने केली. अटक केलेल्यांमध्ये शशिकांत महेंद्रकुमार दवे (40, अमरावती) आणि विजय सहादेवराव चोपडे (40, सिद्धार्थ नगर, अमरावती) यांचा समावेश आहे.

**39 हजारांचा माल जप्त**

तक्रारदार अॅड. प्रशांत एन. भेलांडे (62, रुख्मिणीनगर, अमरावती) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या मालकीच्या वेलकम पॉईंटजवळील 'इन्फिनिटी टॉवर' या बांधकामाधीन इमारतीतून अज्ञात चोरट्यांनी तब्बल 75 अॅल्युमिनियम पाईप (किंमत सुमारे 60 हजार रुपये) चोरले होते. चोरट्यांनी चोरीसाठी एका ऑटो रिक्षाचा वापर केल्याचे उघड झाले होते. फिर्यादीनंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. दरम्यान, डीबी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छाननी करून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपी शशिकांत दवेने चोरीची कबुली दिली. त्याच्या निशाणदर्शीने 15 अॅल्युमिनियम पाईप (किंमत सुमारे 39 हजार रुपये) जप्त करण्यात आले. उर्वरित माल व तिसरा संशयित शोधात आहे. या कारवाईत वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल वर, पोलिस निरीक्षक (क्राईम) विजया पंधरे, समाधान वाटोरे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकप्रमुख मनोजकुमार मानकर, डीबी इंचार्ज प्रकाश मिसाळ, नितीन कामडी, आकाश ठाकरे, मंगेश मूलनकर, धनराज कुमरे आणि मतीन शेख यांनी सहभाग घेतला.

# आठ तालुक्यांचा मदतीच्या यादीत समावेशासाठी प्रयत्न

## तातडीच्या मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.10 )**– जिल्ह्यात या हंगामात जून ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तथापि, शासनाने दि. 9 ऑक्टोबर रोजी जाहीर केलेल्या नुकसानभरपाई मदतीच्या यादीत अमरावती जिल्ह्यातील सर्व तालुके समाविष्ट नसल्याने उर्वरित आठ तालुक्यांसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी त्यांनी विभागीय आयुक्तांना तातडीचे पत्र पाठवले आहे.

सध्या जाहीर करण्यात आलेल्या मदतीच्या यादीत अमरावती, नांदगाव खंडेश्वर, चिखलदरा, धारणी, चांदुर बाजार आणि मोर्शी या सहा तालुक्यांचा समावेश आहे. तर भातकुली, धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, अचलपूर, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, वरुड आणि तिवसा हे आठ तालुके वगळले गेले आहेत.

### धामणगाव व चांदूर रेल्वेमध्ये सर्वाधिक नुकसान

जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, काही तालुक्यांमध्ये 100 टक्के मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असूनही त्यांना यादीतून वगळण्यात आले आहे. उदाहरणार्थ, धामणगाव रेल्वे व चांदुर रेल्वे तालुके 100त्न अतिवृष्टीग्रस्त, तरीही ते यादीबाहेर आहेत. तसेच भातकुली 83त्न, तिवसा 60त्न, दर्यापूर 38त्न, अचलपूर 17त्न, अंजनगाव 0त्न आणि वरुड 71 टक्के मंडळे अतिवृष्टीग्रस्त असूनही त्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.जिल्ह्यातील एकूण 91 पैकी 56 मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याचे अहवालात नमूद आहे. या सर्व तालुक्यांमध्ये शेतीपिकांसह फळपिकांचेही मोठे नुकसान झाले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी सुधारित निकषांनुसार या आठही तालुक्यांना मदत मिळावी अशी विनंती विभागीय आयुक्तांकडे केली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४


# आक्रोशानंतर वरुड-मोर्शी तालुक्याचा पीक नुकसानामध्ये समावेश

## प्रशासनाकडून नविन अध्यादेश जारी

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, (दि. 10)-** इतर तालुक्यांप्रमाणे मोर्शी व वरूड तालुक्यातही सततच्या अवकाळी पावसामुळे शेतातील सोयाबीन, कापूस, मका आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र, या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी महसूल व कृषी विभागाला अद्याप कोणतेही लेखी आदेश प्राप्त झाले नव्हते, त्यामूळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये प्रचंड आक्रोश पहायला मिळाला. त्यामूळे अखेर प्रशासनाला नविन अध्यादेश काढून वरुड, मोर्शी तालुक्याचा पीक नुकसान क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आला.

शेतकऱ्यांची मागणी होती की, शासनाने जाहीर केलेल्या मदतीचा लाभ मिळवण्यासाठी पंचनामे होणे आवश्यक आहे. पण पंचनाम्याची प्रक्रिया सुरूच न झाल्याने शेतकऱ्यांचे हाल अधिकच वाढले आहेत. यामुळे



मोर्शी-वरूड परिसरातील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्र्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून संबंधित विभागांना पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत होती.

## विलास पाटील यांच्या नेतृत्वात तहसीलदारांना निवेदन


**वरुड** – तालुक्यातील बेनोडा शहीद मंडळात सप्टेंबर महिन्यात तब्बल 66.5 मिलिमीटर पावसाची नोंद झाली असूनही शासनाच्या अतिवृष्टीग्रस्त भागांच्या यादीत या मंडळाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे येथील शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत असून या अन्यायकारक निर्णयाविरोधात शेतकऱ्यांनी जामगाव सेवा सहकारी सोसायटीचे संचालक विलास पाटील यांच्या नेतृत्वात तहसीलदारांकडे निवेदन सादर केले. निवेदनकर्ते विलास पाटील यांच्यासह बेनोडा शहीद मंडळातील सर्व शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शासनाच्या नियमांनुसार 65 मि.मी. पेक्षा अधिक पावसाची नोंद झाल्यास त्या भागास अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करण्याचा नियम आहे. परंतु बेनोडा शहीद मंडळात 66.5 मि.मी. पाऊस पडूनही शासनाने



या भागाचा समावेश अतिवृष्टीग्रस्त यादीत केला नाही, ही अत्यंत अन्यायकारक बाब असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. सततच्या पावसामुळे संत्रा, मोसंबी, सोयाबीन, कपाशी व तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे उत्पादन कोसळले असून कर्जाचा बोजा वाढला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे सादर केलेल्या निवेदनाद्वारे शासनाने तात्काळ या प्रकरणाची दखल घेऊन बेनोडा शहीद मंडळाला अतिवृष्टीग्रस्त घोषित करावे व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. यावेळी बेनोडा शहीद मंडळातील पंकज बांबल , नितीन पेलागडे, प्रकाश हुरडे, घनश्याम भोपती, मोहित गुर्जर, गौरव ढोबळे, अनिल ढोंगे, हर्षल ढोंगे, प्रवीण पांढरे, मंगेश गावंडे, सुजल जिचकार, रितेश उदापूरकर, धर्मेंद्र गोहाड, अभिजीत इंगोले, कमलेश नवले, बाल्या चढोकार, संजय गोडबोले, संजय परतेती, संजय धुर्वे, राहुल गावंडे, राहुल शिवारे, नथू वानखडेसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## मोर्शी तालुक्यातील 6 महसूल मंडळ मदतीपासून राहणार वंचित ?

**मोर्शी**– अतिवृष्टी मदतीमध्ये मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर महसूल मंडळाचाच समावेश असून तालुक्यातून फक्त रिद्धपूर मंडळाचेच पंचनामे शासनाकडे सादर झाल्यामुळे शासनाने 31 हजार 628 कोटी रुपयांच्या अतिवृष्टी च्या पॅकेज मधून मोर्शी तालुक्यातील फक्त रिद्धपूर मंडळालाच मदत मिळणार असल्याचे निदर्शनास येत आहे.



मोर्शी तालुक्यातील सर्वच मंडळामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनसुद्धा मोर्शी तालुक्यातील 6 महसूल मंडळांचा समावेश नसल्यामुळे हिवरखेड, अंबाडा, शिरखेड, धामणगाव, मोर्शी आणि नेरपिंगळाई या संपूर्ण महसूल मंडळातील पंचनामे न झाल्यामुळे सर्वच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मदतीपासून वंचित रहावे लागणार असल्याचे चित्र दिसत असून याचा सर्वाधिक फटका हा 25 हजार हेक्टर क्षेत्रांतील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना बसणार आहे. कोट्यावधी रुपयांच्या मदतीपासून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना वंचित रहावे लागणार असल्यामुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाण्याची शक्यता आहे. मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे अतोनात नुकसान झाल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिसला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मोर्शी तालुक्यातील मदतीपासून वंचित असलेल्या हिवरखेड, मोर्शी, अंबाडा, शिरखेड, धामणगाव, नेरपिंगळाई या सर्व महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून विशेष बाब म्हणून तत्काळ मदत जाहीर करावी अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे .

# दिलासादायक ; सीसीआय अंतर्गत कापूस खरेदीला सुरुवात

## प्रतिक्विंटल 8200 दर निश्चित

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार,(दि.10) –** कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आली आहे. भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) अंतर्गत या हंगामात कापसाची खरेदी सुरू झाली असून, प्रतिक्विंटल 8200 इतका दर निश्चित करण्यात आला आहे.



या योजनेतून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला हमीभाव मिळणार असून, कापूस विक्रीसाठी पूर्वनोंदणी अनिवार्य असल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांना नोंदणीसाठी कोणतीही अडचण येऊ नये म्हणून चांदूरबाजार कृषी उत्पन्न बाजार समितीने विशेष व्यवस्था केली आहे. बाजार समितीचे सभापती सतीश मोहोड यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी आपला कापूस सीसीआय अंतर्गत विक्रीसाठी बाजार समितीत येऊन लवकरात लवकर नोंदणी करावी. यासाठी स्वतंत्र काउंटर व सहाय्यक कर्मचारी नेमण्यात आले आहेत. ही योजना शेतकऱ्यांना हमीभावात कापूस विक्रीची सुरक्षित संधी उपलब्ध करून देणारी आहे. बाजारात पडणाऱ्या भावचढ-उतारांपासून दिलासा मिळत असून, या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य आणि आधार मिळणार आहे.

# भातकुलीमध्ये प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## 14 ऑक्टोबरपर्यंत हरकती दाखल करण्याची मुदत

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 10)–** राज्य निवडणूक आयोगाने अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषद (जि.प.) आणि पंचायत समिती (पं.स.) सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार भातकुली तालुक्यातील मतदारांसाठी महत्त्वाची सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार, जि.प. आणि पं.स. निवडणुकीसाठी गट निहाय तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार याद्या दिनांक 8 ऑक्टोबर 2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. भातकुली तालुक्यातील नागरिक आणि संबंधितांना ही यादी तहसील कार्यालय, भातकुली आणि पंचायत समिती कार्यालय, भातकुली येथे अवलोकनासाठी उपलब्ध आहे.

या प्रारूप मतदार यादीवर ज्या कोणाला हरकती किंवा सूचना दाखल करायच्या असतील, त्यांच्यासाठी 14 ऑक्टोबर 2025 पर्यंत मुदत देण्यात आली आहे. इच्छुक नागरिकांनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात तहसील कार्यालय, भातकुली येथे मुदतीपूर्वी सादर कराव्यात. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार केल्यानंतर, मतदान केंद्रांची आणि मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार यादी 27 ऑक्टोबर 2025 रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे, अशी माहिती भातकुली तहसिलदार यांनी दिली आहे.

## पंचायत समितीस्तरावर सोमवारी आरक्षण सोडत

**अमरावती**– राज्य निवडणूक आयोगाने पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीकरीता सदस्यांचे आरक्षण निश्चित करण्याबाबत कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यानुसार सोमवार, दि. 13 ऑक्टोबर रोजी दुपारी 3 वाजता भातकुली पंचायत समितीसाठी तहसिल कार्यालय, भातकुली जैन येथे आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुक्रम नियम, 2025 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्व साधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्यासाठी सोडत पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी विशेष सभा आयोजित केली आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माधान येथे दृष्टीबाधित, अल्पदृष्टी दिव्यांग बांधवांचे भव्य संमेलन आज

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, (दि. 10) –** दृष्टीबाधित आणि अल्पदृष्टी दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी एक प्रेरणादायी तसेच सामाजिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण भव्य संमेलनाचे आयोजन माधान येथे करण्यात आले आहे. हे संमेलन 11 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 10 वाजता श्री संत गुलाबराव महाराज मंदिर परिसरात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री संत गुलाबराव महाराज संस्थान, माधान आणि समदृष्टी समता विकास सेवा अनुसंधान मंडळ (सक्षम), अमरावती जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या संमेलनात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष



महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच, प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख हे आपले विचार मांडणार आहेत.

सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत पार पडणाऱ्या या कार्यक्रमात विविध सामाजिक उपक्रम, प्रबोधनपर भाषणे आणि दिव्यांग बांधवांसाठी प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. माधान परिसरात या संमेलनाबाबत उत्साहाचे वातावरण असून, परिसरातील नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.

# धारणी नगराध्यक्ष पदाकरिता रामकृष्ण सोनोने इच्छुक

## भारतीय जनता पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज दाखल

महासागर | प्रतिनिधी

**धारणी,(दि.10) –** धारणी नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या (2025-2026) पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, भारतीय जनता पक्षाचे (भाजप) धारणी शहर मंडळाचे सक्रिय सदस्य रामकृष्ण राजाराम सोनोने यांनी नगराध्यक्ष पदासाठी पक्षाकडे आपली दावेदारी सादर केली आहे.

सोनोने यांनी नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून उमेदवारी मिळावी यासाठी मेळघाट जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) मा. प्रभुदासजी भिलावेकर यांच्याकडे आपला अर्ज अधिकृतरित्या सादर केला. या अर्जाद्वारे त्यांनी पक्षातील आपल्या निष्ठेचा आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या पाठिंब्याचा ठसा उमटवला आहे. रामकृष्ण सोनोने हे पक्षाच्या कामात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून, स्थानिक पातळीवर त्यांचा चांगला जनसंपर्क आणि प्रभाव आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग, तसेच जनतेच्या समस्यांबाबत तत्परता दाखवल्याने त्यांची लोकप्रियता वाढली आहे. त्यांच्या




या उमेदवारीमुळे भाजपकडून धारणी नगराध्यक्ष पदासाठी एक प्रबळ आणि लोकमान्य दावेदार समोर आल्याचे मानले जात आहे. पक्षाच्या अंतर्गत चर्चेनंतर लवकरच अधिकृत उमेदवाराची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शिवसेनेचे तहसील कार्यालयावर आंदोलन

## सातबारा कोरा करण्याची मागणी

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, (दि. 10)–** शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने चांदूर बाजार येथे हंबरडा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व खासदार अरविंद सावंत यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

मोर्चादरम्यान तहसील कार्यालयावर जाऊन तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन



देण्यात आले. प्रमुख मागण्यांमध्ये ओला दुष्काळ जाहीर करणे, शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत देणे, पंतप्रधान पिक विमा योजनेतील अटी हटवून सर्वांना सरसकट विमा लाभ देणे, गरजू घरकुलधारकांना तात्काळ घरकुल मंजुरी देणे, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना मेडिकल दाखल्यावर वयाचा पुरावा ग्राह्य धरणे आणि लाभार्थ्यांच्या शालेय फी माफ करणे या मागण्या प्रमुख होत्या. यावेळी जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे, उपजिल्हा प्रमुख आशिष वाटाने, महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख निर्मला कौढण्यपुरे, तालुका प्रमुख शैलेश पांडे, युवासेना तालुका प्रमुख रोशन जयसिंगपूरे, अनिल सायंदे, पप्पू आखरे, नरेंद्र फिस्के, ओमप्रकाश दीक्षित, श्रुष्टी वाघमारे आदींसह मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि शेतकरी उपस्थित होते. या आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून त्यांच्या मागण्यांसाठी शिवसेना लढत राहील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध

## दीक्षाभूमी स्मारक समिती एसडीओंना निवेदन

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, (दि.10) –** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ दीक्षाभूमी स्मारक समिती अचलपूरच्या वतीने उपविभागीय अधिकारी (एसडीओ) अचलपूर यांना निवेदन देण्यात आले.

दि. 7 ऑक्टोबर रोजी सुप्रीम कोर्टात सुनावणीदरम्यान राकेश रघुराज किशोर (वय 71, मयूर



विहार, दिल्ली) या वकिलाने कोर्टात सरन्यायाधीश गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न केला आणि सनातन धर्म का अपमान नही सहेगा हिंदुस्तान अशा घोषणाही दिल्या. या प्रकारामुळे देशभरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हा हल्ला न्यायव्यवस्था आणि लोकशाहीवरील आघात असून एका बौद्ध व दलित सरन्यायाधीशावरचा हा नियोजित कट आहे. अशा प्रकारच्या घटनांची चौकशी उच्चस्तरीय समितीद्वारे करण्यात यावी आणि आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच भूषण गवई यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात यावी आणि सेवानिवृत्तीनंतरही त्यांना सुरक्षा प्रदान करण्यात यावी, अशीही मागणी समितीने केली. या वेळी किशोर मोहोड, अॅड. प्रभाकर मोहोड, सुनील जवंजाळ, पुंडलिकराव वानखडे, सुधीर वानखडे, अॅड. मिलिंद थोरात, जीवन गायकवाड, प्रमोद कांबळे, अॅड. सुभाष चावरे, प्रा. रमेश बडगे यांच्यासह अनेक नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गौरखेडा कुंभी ग्रामपंचायतीत चौकशीसाठी अधिकाऱ्यांची लेटलतीफी!

## तक्रारकर्त्यांचा संताप

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा,(दि.10) –** गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत अंतर्गत दाखल झालेल्या तक्रारीच्या चौकशीसाठी पंचायत समिती अचलपूरचे गटविकास अधिकारी नियोजित वेळेत उपस्थित न राहिल्याने ग्रामपंचायतीत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. चौकशीसाठी सकाळी अकरा वाजता उपस्थित राहिलेले तक्रारकर्ते दुपारी दोनपर्यंत प्रतीक्षा करत बसले, मात्र अधिकारी हजर झाले नाहीत.




ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे चौकशीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, चौकशीसाठी कोण अधिकारी येणार आहेत, मात्र विस्तार अधिकारी की गटविकास अधिकारी याबाबत स्पष्ट माहिती देण्यात आली नाही. या उत्तरामुळे तक्रारकर्त्यांमध्ये संभ्रम व नाराजीचे निर्माण झाली. सदर तक्रार एप्रिल 2025 मध्ये दाखल करण्यात आली होती, अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रत्यक्ष चौकशी झालेली नाही. नागरिकांच्या मते, अधिकारी नियोजित वेळेत न आल्याने प्रशासनाचा निष्काळजीपणा स्पष्ट दिसतो. ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या माहितीनुसार, संध्याकाळी साडेपाच वाजता विस्तार अधिकारी सातंगे आले होते, मात्र त्या वेळेपर्यंत तक्रारकर्ते परत गेले होते. गौरखेडा कुंभी ग्रामपंचायतीत अशा निष्काळजी वृत्तीमुळे चौकशी प्रक्रिया आणि शासनाच्या योजनांवरील नागरिकांचा विश्वास कमी होत चालल्याचे स्पष्ट दिसत आहे.

अधिकारी अनुपस्थित राहिल्यामुळे लोकांचा प्रशासनावरील विश्वास कमी होत आहे. जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी.
**धर्मेंद्र सदांशीव,**
**तंटामुक्ती अध्यक्ष.**



ग्रामपंचायतीत अनेक तक्रारी महिन्यांपासून प्रलंबित आहेत. अधिकारी वेळेवर हजर राहत नसल्याने गावकऱ्यांचा त्रास वाढतो आहे.
**प्रदीप बारखडे,**
**ग्रामस्थ गौरखेडा कुंभी.**



# एआयएमआयएम कार्यकर्ता मेळाव्यात सेक्युलर पक्षांवर टीकास्त्र

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.10)–** अंजनगाव सुर्जी येथील आर.के. लॉनमध्ये दि. 5 ऑक्टोबर रोजी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) पक्षाचा अमरावती जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्ष जनाब सैयद मुजीब यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

मेळाव्याला अमरावती शहर, अचलपूर, दर्यापूर, चांदूर, मोर्शी, वरुड, धारणी, चिखलदरा आणि धामणगाव रेल्वे अशा विविध तालुक्यांतून मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या मेळाव्यामुळे एआयएमआयएमचा कार्यकर्ता वर्ग उत्साहात भरला होता. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश




उपाध्यक्ष जनाब युसूफ पंजाबी, शहराध्यक्ष हाजी इरफान, तसेच जिल्हाध्यक्ष सैयद मुजीब यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी तथाकथित सेक्युलर पक्षांवर जोरदार टीका केली.

ते म्हणाले, 'वर्षानुवर्षे सेक्युलरच्या नावाखाली मुस्लिम समाजाचे मत घेतले गेले, परंतु त्यांच्या हक्कासाठी कोणीच उभे राहिले नाही. आता वेळ आली आहे की मजलिसचे कार्यकर्ते समाजापर्यंत खरी गोष्ट पोहोचवतील आणि एआयएमआयएमचा संदेश घराघरात नेतील.' मेळाव्याचे प्रमुख अतिथी समीर साजिद (महासचिव, महाराष्ट्र एआयएमआयएम) होते. प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये साजिद फुलारी, मौलाना सैयद मोहसिन, अब्दुल हमीद, मोहम्मद आदिल, शेख अमजद, जकी अहमद, रफिक, मोहम्मद इमरान, मोहम्मद रेहान, आणि मजहर खान यांचा समावेश होता.

